शुक्रवार, 16 सप्टेंबर 2022
⊙ किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 46
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● FRIDAY 15 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-46 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-6 ● PRICE-5

## संभाजीराजे छत्रपतींच्या मुद्दांवर समाधानकारक तोडगा काढू : मुख्यमंत्री



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** स्वराज्य संघटनेचे संस्थापक आणि राज्यसभेचे माजी खासदार संभाजीराजे छत्रपती आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भेटीवरुन नाट्यमय घडामोडी घडल्याच्या चर्चा सुरु होत्या. मराठा समाजाच्या प्रश्नांसदर्भात संभाजीराजे छत्रपती एकनाथ शिंदेंना भेटण्यासाठी आले होते. बराच वेळ थांबून देखील भेट न झाल्यानं संभाजीराजे मंत्रालयातून निघून गेल्याच्या चर्चा होत्या. यावरुन उलटसुलट चर्चांना उधाण आलं होतं.
अखेर स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते संभाजीराजे छत्रपती यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची आज सह्याद्री अतिथीगृहात सदिच्छा भेट घेतली. दोन्ही नेत्यांची भेट झाल्यानं नाट्यमय घडामोडींबाबतच्या चर्चा थांबल्या.
एकनाथ शिंदे आणि संभाजीराजे यांच्या भेटीत मराठा समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. मराठा समाजाशी संबंधित सर्व विषयावर विस्तृतपणे चर्चा करण्यात आली. संभाजीराजेंनी मांडलेल्या सर्व मुद्द्यांवर यावेळी चर्चा करून शासनाकडून त्यावर समाधानकारक तोडगा काढण्याबाबत मुख्यमंत्र्यांनी त्यांना आश्वस्त केल्याची माहिती आहे.
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी संभाजीराजे मंत्रालयात आले होते. मात्र, दीड तास थांबूनही भेट न झाल्यानं संभाजीराजे मंत्रालयातून निघून गेल्याच्या चर्चा सुरु झाल्या होत्या. अखेर सह्याद्री अतिथीगृहात दोन्ही नेत्यांमध्ये भेट होऊन चर्चा झाली आहे.
संभाजीराजे छत्रपतींनी मराठा समाजाचे विविध प्रश्न व मराठा उमेदवारांची नियुक्ती या विषयांच्या पाठपुराव्याकरिता आज मंत्रालय येथे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे यांची भेट घेतली. यावेळी स्वराज्य संघटनेचे पदाधिकारी त्यांच्यासोबत उपस्थित होते.
आझाद मैदानावरील आमरण उपोषणात कोपर्डी खटला, आरक्षण, आंदोलनातील गुन्हे, सारथी, आण्णासाहेब पाटील महामंडळ, वसतिगृह यांबरोबरच नियुक्त्यांचा मुद्दा देखील प्रकर्षाने घेतला होता.
यानंतर नुकताच शासनाने २०१४ ते सप्टेंबर २०२० पर्यंत शासकीय सेवांमध्ये निवड झालेल्या सर्व मराठा उमेदवारांना नियुक्त्या देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमबजावणी कशा पद्धतीने सुरू आहे, याची आज प्रत्यक्ष पाहणी केली. काही उमेदवारांना या प्रक्रियेत प्रशासकीय अडचणी येत आहेत. या अडचणी ऐकून घेऊन त्यांची सोडवणूक व्हावी व प्रत्येक उमेदवारास त्याची हक्काची नोकरी मिळावी, यासाठी खात्यांतर्गत समन्वय साधण्याकरिता शासनाने स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा, अशी सूचना केल्याची माहिती संभाजीराजे छत्रपती यांनी दिली.

### महत्त्वाची बातमी




## १३ दिवसात निकाली काढली पाच हजार प्रकरणे

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायधीश उदय लळित यांनी पदभार स्वीकारल्यानंतर न्यायालयातील पेंडीग प्रकरणे निकाली काढण्याचा सपाटा लावला आहे. त्यांनी अवघ्या १३ दिवसांत पाच हजारांच्यावर प्रकरणं निकाली काढली आहेत. बार अँण्ड बेंच या वेबसाईटने दिलेल्या माहितीनुसार, सर्वोच्च न्यायालयाने गेल्या १३ दिवसांत एकूण ५११३ प्रकरणे निकाली काढली आहेत. यामध्ये २८३ नियमित, १२१२ हस्तांतरण केलेल्या तर ३६१८ अन्य प्रकरणांचा समावेश आहे. ही प्रकरणं निकाली काढण्यासाठी नवीन प्रणाली लागू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायधीश उदय लळित या पदभार स्वीकारल्यानंतर न्यायप्रक्रियेत जे बदल केलेत त्यापैकी हा एक बदल आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयात कामांच्या दिवशी नियमीत प्रकरणाच्या सुनावणी दुपारी १०.३० ते १ दरम्यान घेण्यात येत आहेत. तर अन्य दिवशी दुपारी २ ते ४ या वेळात इतर प्रकरणांच्या सुनावणी घेण्यात येत आहे.

## दिल्लीच्या उपमुख्यमंत्र्यांचे थेट पंतप्रधानांना आव्हान

### मला सोमवारपर्यंत अटक करावी नाही तर सोमवारी माझी माफी मागावी



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : गुजरातमधील विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी विरुद्ध आम आदमी पार्टी असा संघर्ष शिगेला पोहोचल्याचं चित्र पहायला मिळत आहे. गुजरातमध्ये आपची सत्ता येणार असा विश्वास पक्षाचे सर्वेसर्वा आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी व्यक्त केला आहे. एकीकडे गुजरातमध्ये रणधुमाळी सुरु असताना दुसरीकडे दिल्लीमध्येही दिल्ली सरकारच्या उत्पादन शुल्क धोरणातील (मद्यविक्री धोरण) कथित गैरव्यवहारांप्रकरणी भाजपा आणि आप आमने-सामने आल्याचं चित्र पहायला मिळत आहे.**



दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या निवासस्थानासह सात राज्यांतील २१ ठिकाणी १९ ऑगस्ट रोजी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) छापे टाकले होते. या छाप्यांमुळे दिल्लीत खळबळ माजली असून आम आदमी पक्ष (आप) आणि भाजप यांच्यातील राजकीय लढाई तीव्र झाल्याचं पहायला मिळालं होतं. आता याच छाप्यांचा संदर्भ देत मनीष सिसोदियांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आपली माफी मागावी असं म्हटलं आहे. मनीष सिसोदीया यांनी भाजपा माझ्याविरोधात स्टिंग ऑप्रिशन करत असल्याचा आरोप केला आहे. यावेळी सिसोदीया यांनी सीबीआयच्या छाप्यांचाही संदर्भ दिला आहे. "सीबीआयने माझ्या घरावर छापे मारले. त्यांना काही सापडलं नाही. त्यांना तिजोऱ्यांमध्येही काही सापडलं नाही. आता भाजपा स्टिंग ऑप्रेशनच्या माध्यमातून मला लक्ष्य करत आहे. सीबीआय आणि ईडीने स्टिंग ऑप्रेशनचीही चौकशी करावी," असं सिसोदिया ट्वीटमध्ये म्हणाले आहेत.
दिल्लीमध्ये अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील सरकारने नोव्हेंबर महिन्यामध्ये नवे उत्पादन शुल्क धोरण लागू केले होते. या धोरणाअंतर्गत मद्यविक्रीचा परवाने खासगी ठेकेदारांना देण्यात आले. मात्र आठ महिन्यांनंतर म्हणजेच ३० जुलै रोजी हे धोरण मागे घेण्यात आले. त्यानंतर या मद्यविक्री धोरणामध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप दिल्ली विधानसभेत विरोधी पक्ष असणाऱ्या भाजपाने केला. दिल्लीच्या मुख्य सचिवांनी अहवाल सादर केला. त्यानंतर नायब राज्यपाल विनय सक्सेना यांच्या आदेशानुसार या प्रकरणी 'सीबीआय'ने सिसोदिया यांच्यासह १६ जणांविरोधात गुन्हे दाखल केले. याप्रकरणी १९ ऑगस्टपासून चौकशी सुरू करण्यात आली आहे. नवे उत्पादन शुल्क धोरण निश्चित करणाऱ्या या विभागातील माजी आयुक्तांसह काही अधिकाऱ्यांच्या निवासस्थानी छापेमारी करण्यात आली होती. या प्रकरणामुळे चर्चेत असणारा उत्पादन शुल्क विभाग उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्या अखत्यारित येतो. याच कारणामुळे त्यांच्या निवासस्थानीही छापेमारी करण्यात आली होती. कारवाई करण्यात आली.

## 'हे' रात्री बावचळून उठतात अन् खोके - खोके म्हणतात !

### अजित पवारांची एकनाथ शिंदे गटावर टोलेबाजी !

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाल्यापासून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये तुफान कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळत आहे. शिंदे गटातील आमदारांच्या बंडखोरीवरून सातत्याने विरोधी पक्षांकडून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले जात आहे. यामध्ये विधानभवनात दिलेल्या "५० खोके, एकदम ओके" या घोषणेची तर महाराष्ट्रभर चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि राज्याचे विधानसभा विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी शिंदे गटाला खोचक शब्दांत टोला लगावला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी एकनाथ शिंदे गटाच्या बंडखोरीवरून टोलेबाजी केली. तसेच, राज्य सरकार कुणाच्या दबावाखाली काम करतंय का? असा सवालही अजित पवार यांनी उपस्थित केला आहे. "शिंदे सरकार कुणाच्या दबावाखाली झुकतंय का? शिंदे सरकारमध्ये दबाव झुगारण्याची ताकद नाहीये का? छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला शिकवलंय की कारण नसताना कुणाच्यासमोर झुकायचं नाही. पण इथे तर झुकायला सुरुवात झाली. अजून तर अडीच महिनेही नाही झाले", असे अजित पवार म्हणाले.
५० खोके, एकदम ओके या विरोधकांच्या घोषणेच्या मिरच्या सत्ताधाऱ्यांना झोंबल्याचे अजित पवार यावेळी म्हणाले. "५० खोके, एकदम ओके या घोषणा त्यांना झोंबल्या. खरंच..खोटे नाही सांगत. रात्री बावचळून उठतात. खोकं खोके खोके.. ओके ओके ओके! आरे कशाचे खोके आणि कशाचे खोके?" असा टोला अजित पवारांनी यावेळी लगावला.
दरम्यान, वेदान्ता-फॉक्सकॉन प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे संतप्त प्रतिक्रिया देताना अजित पवारांनी आज सकाळी राज्य सरकारवर टीकास्त्र सोडलं होतं."उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना वेदान्त प्रकल्प राज्यात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न झाले. वेदान्तने कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि महाराष्ट्राला निवडलं होते. मात्र, आता गुजरातचे नाव समोर येत आहे.
महाराष्ट्रात येणारा प्रकल्प दुर्लक्षामुळे बाहेर जात असेल, तर कदापी खपवून घेतलं जाणार नाही", असा इशारा अजित पवारांनी दिला आहे.
यावेळी बोलताना अजित पवारांनी शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनाही टोला लगावला आहे. संजय गायकवाड यांनी "चुन चुन के मारेंगे" असं विरोधकांना उद्देशून म्हटल्यानंतर त्यावरून अजित पवारांनी खोचक टोला लगावला आहे. "बुलढाण्याचे एक आमदार म्हणाले की एकनाथ शिंदेंविरोधात बोलाल तर चुन चुन के, गिन गिन के मारेंगा.. अरे तुला काय घरच्या किड्या-मुंग्यांसारखे वाटलो का? चुन चुन के, गिन गिन के मारेंगे", असं अजित पवार म्हणाले.






# रेषेत भविष्य शोधणे

**जब हात से हात मिल जाते है,**
**तब जिने के अंदाज बदल जाते है..**

**हात की लकीरे हमेशा**
**जिना सिखाती रहती है..**




संजय जेवरीकर
ज्येष्ठ पत्रकार
संपर्क क्र. 7887307789

काल दारावर आलेला भविष्यकार जोरजोरात आयुष्याची कुंडली सांगत होता. हात हातात घेतला की रेषा पाहून भविष्य सांगणाऱ्याची मला कमाल वाटत आली आहे.
आपले भविष्य आपल्या हातात असते की हातावरच्या रेषेत? कायम आपल्याला पडत आलेला प्रश्न. 'दे रे हरी पलंगावरी' म्हणत जगणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे हे नवनवीन मार्ग शोधण्यात धन्यता आपण मानतो. बाबा, देव, जप, तप ही मनाच्या समाधानाची साधने असावीत म्हणजे काम करायला उभारी मिळते आणि जे मनात आहे ते घडते, आपण काम न करता त्यात समाधान शोधण्याचा प्रयत्न करतो. हातावरच्या रेषांपेक्षा, कस जगायचं याची रेषा आखता आली पाहिजे आणि त्याच्या कक्षेत राहून जगता आलं पाहिजे, तरच जीवन सार्थकी लागत.
काम इतकं करावं की हातावरच्या रेषा मिटून जाव्यात आणि घामाच्या धारात जगणं शोधता यावं. हातावरच्या रेषेत भविष्य शोधणे ज्या दिवशी थांबेल त्या दिवसापासून तुमचं जगणं सुकर होईल.




# कर्तेपणा टाकणे हाच परमार्थ !



आधुनिक केसरी

दोरीला जो साप म्हणून समजला तो बद्ध; पण दोरीला दोरी म्हणून ज्याने ओळखले, तो मुक्त समजावा. 'देही मी नव्हे' हे ज्याला समजले तो मुक्तच. सत्यज्ञान करून घेणे म्हणजेच मुक्तावस्था आहे. बद्धदशा आमची आम्ही निर्माण केली. काळजी, तळमळ आणि दुःख ही बद्धपणाची लक्षणे होत, तर कोणत्याही परिस्थितीत आनंदाने राहणे हे मुक्तपणाचे लक्षण आहे. जागे होणे म्हणजे मुक्तदशेला येणे आहे. माझे माझ्याजवळच आहे, पण ठाऊक नाहीसे झाले आहे. भगवंताला विसरल्याने 'मी देही' असे म्हणू लागलो आहे. देह तर माझ्या ताब्यात नाही, तेव्हा मी देही नाही हे सिद्ध झाले. आपण कर्तेपण आपल्याकडे घेतो, आणि त्याबरोबर सुखदुःखही आपल्याकडे घेतो. मला सुख नाही आणि दुःखही नाही असे ज्याला वाटेल, तो मुक्त समजावा. कर्तेपण घातुक असते. मी एवढा मोठा वाडा बांधला, प्रपंच चांगला केला, असा प्रापंचिकाला अभिमान वाटतो, तर संन्यासी मठाचाच अभिमान धरून बसतो ! म्हणजे कर्तेपणाच्या बाधेतून दोघांचीही सहजी सुटका होत नाही. हे कर्तेपण सोडावेसे वाटले तरी ते आपल्याला सुटत नाही, याचा आपल्याला नेहमी अनुभव येतो. भगवंताचे अस्तित्व पटल्यानेच कर्तेपणा कमी होतो. म्हणून, भगवंताच्या अखंड स्मरणात राहावे, आणि भगवंत ठेवील त्यात समाधान मानावे. भगवंताच्या स्मरणाशिवाय जिथे आपल्याला सुख होते, तो विषय समजावा. विषयाच्या संगतीत परमात्म्यापासून वेगळे असणे याचे नाव प्रपंच, आणि परमात्म्याच्या संगतीत विषयात राहणे याचेच नाव परमार्थ. फळाची अपेक्षा ठेवून आपण जी कृती करतो ते कर्म होय; पण फळाची काहीही अपेक्षा न ठेवता आपण जे कर्म करतो ते कर्तव्य ठरते. आणि असे कर्तव्य भगवंताच्या स्मरणात करीत राहणे हाच परमार्थ. हे करीत असताना भगवंताला दृष्टीआड न होऊ देणे, याचेच नाव अनुसंधान होय. समजा, आपण एखादे चांगले पुस्तक वाचीत बसलो आहोत, इतक्यात आपल्या पायाला एक मुंगी चावली; त्याची जाणीव आपल्याला कशी चटकन होते ! ती जाणीव सर्व शरीरभर व्यापून असते, त्याचप्रमाणे भगवंताच्या अनुसंधानाने प्रपंचाला व्यापून ठेवले पाहिजे. प्रपंचातला कोणताही उद्योग करताना अनुसंधान टिकवावे. अनुसंधानाचा अभ्यास करावा. भगवंताचे अनुसंधान आपल्याला भगवंताकडे घेऊन जाते. मी अनुसंधान टिकवीन असा मनाचा निश्चय करावा.

**बोधवचन : आपले कर्तव्याला न विसरावे। भगवंताचे अनुसंधान राखावे॥**

**श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर**



आधुनिक केसरी

**सारी मोह-माया | लुप्त झाली ||**

न दिसे मजला | आणिक दुसरे ||
रूप ते गोजीरे | ध्यानी मनी ||१||

भक्तासाठी देव | विटेवरी उभा ||
पंढरीची शोभा | स्वर्ग भासे ||२||

चंद्रभागे तीरी | भक्तीचा सागर ||
नामाचा जागर | वैष्णवांचा ||३||

वारी एक वेळा | नाही केली जरी ||
श्वासात श्रीहरि | आहे माझ्या ||४||

तुझ्या कृपे देवा | झाली शुद्ध वाचा ||
ज्ञाना-तुकोबाचा | दास झालो ||५||

आणिक मागणे | नाही विठुराया ||
सारी मोह-माया | लुप्त झाली ||६||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## || समर्थ-वाणी ||


आधुनिक केसरी

मारुति सख्या बलभीमा रे ॥ध्रु०॥

अंजनिचे वचनामृत सेवुनि ।
दाखविसी बलसीमा रे ॥१॥

वज्रतनू अति भीम पराक्रम ।
संगित गायनसीमा रे ॥२॥

दास म्हणे तूं रक्षी आम्हां ।
त्रिभुवनपालनसीमा रे ॥३॥



# खरंच वयात आले तर... बदलतेच!

मन तुझे बावरले, हारमोन्स इनबॅलेन्स झाले,
इश्क ही जन्नत मनाच्या खोलवर रुजले,
विमानात बसण्याचे स्वप्न तुझे हाखले,
पल्ला तुझ्या आयुष्याच्या जिद्दीचा भांबावला,
लग्नाच्या स्वप्ननगरीत नाशवंत बेडीत रंगवतोय,
खरंच वयात आले तर खुप काही बदलतेय,

मी गाडीतून उतरली तर... बॉडीगार्ड, कमांडो असतील,
फाईव्ह स्टार तर माझं रोजंचं होईल, असं म्हणायची,
बॉयफ्रेंडच्या बाईकने आणि एका वडापावाने खुश होतेयं,
लग्नाच्या स्वप्ननगरीत राजकुमार पाहणारी,
आत्ता बॉयफ्रेंडच्या गाडीत पेट्रोल टाकतेयं,
खरचं वयात आले तर खुप काही बदलतेयं,

अंड फक्त फुटलं, पंख नाही खुले, खुलले,
बालीश आहेस तु, गणित नाही उमजले,
क्षणभर सुखासाठी आयुष्याला नासवशील,
भविष्यात पुढे फक्त स्वत:ला कोसशील,
या आयुष्यात आयुष्यिकोड्यात स्वत:ला विसरतेयं,
खरचं, वयात आले तर खुप काही बदलतेयं,

नवऱ्याच्या प्रेमात राणी जरी, स्वयंपाक तुच करी,
स्वप्नांच्या मागे आत्ता तर, सेफला तू लिस्ट देई,
घाम नाही तर रक्त सांडवले, तुझ्या स्वप्नांसाठी मायबाप झिजले,
आयुष्य फार सोपं आहे, भविष्य त्याहून उज्वल आहे,
वेळेचं सोनं कर तुं, खरंच आयुष्यी सार्थक होतयं,
खरचं वयात येतेसं जेव्हा तू स्वत:ला घडवतेयं

**मयुरी मिलिंद प्रधान**
विक्रोळी, मुंबई

# भविष्यवाणी

**मेष** — वैवाहिक प्रश्न मार्गी लागतील. आर्थिक समस्येचे निराकरण होण्यास शुभ कालखंड. मसालेदार पदार्थ टाळावेत. अनुमान शक्ति मजबूत करवणारा कालखंड. व्यवसायामध्ये यशस्वी होण्यास अपेक्षित मदत मिळेल.

**वृषभ** — भ्रमाचे विश्व दूर होऊन लवकरच वास्तविकता समोर आणणारी शुभ गृहस्थिती. मित्र परिवाराशी संबंध सलोख्याचे होतील. नवीन व्यवसाय सुरू करणे तुर्तास टाळावे. पोटाच्या व्याधी त्रासदायक ठरू शकतात.

**मिथुन** — नोकरदारांनी कामाच्या ठिकाणी राजकारणात पडणे योग्य ठरणार नाही. कार्यकुशलतेवर विश्वास ठेवणे आवश्यक. किचकट कामे पूर्णपणे पार पडतील. संतंतीची प्रगती होण्यास शुभ कालखंड.

**कर्क** — पारंपारिक सिद्धांत पद्धतीने काम करण्यास प्राधान्य देणे आवश्यक राहील. व्यवसायात प्रगतीकारक स्थिती. इतरांच्या कामात लक्ष घालणे टाळावे. पाठीचे दुखणे त्रासदायक ठरतील.

**सिंह** — वरिष्ठ अधिकारीबरोबर संबंध सुधारतील. कौटुंबिक सुख मिळेल. वातावरणातील दबाव कमी होईल. नातेवाईकांच्या भेटीने मन प्रसन्न राहील. व्यवसायात उत्तरोत्तर प्रगतीचा कालखंड.

**कन्या** — आपल्या वाणीवर नियंत्रण ठेवावे. कामाच्या ठिकाणी अनुभवी व्यक्तीचे सहकार्य लाभेल. जोडीदाराची तब्येत काळजीचा विषय ठरू शकतो. संततीचे अभ्यासात मन रमेल. गुंतवणूक करण्यास शुभ कालखंड.

**तुळ** — कलाकाराच्या कलागुणांना वाव मिळेल. कुठल्याही प्रकारची गडबड करू नये. सर्वच कामे मार्गी लागतील. कामाच्या ठिकाणी अपेक्षित सहकार्य मिळेल. मनावरचे दडपण दूर होईल. प्रेमी युगलांसाठी भेटीचे शुभ योग.

**वृश्चिक** — उच्च पदस्थ व्यक्तीच्या भेटीने बरेच कामे मार्गी लागतील. प्रभावशाली व्यक्तिमत्व संपर्कात येतील. पद व प्रतिष्ठा उंचवणारा काळ. प्रवास सत्करणी लागतील. मित्रांच्या भेटीने मन प्रसन्न राहील.

**धनु** — मानसन्मान वाढवणारा कालखंड. खर्च आवाक्यात राहतील. वैवाहिक संबंध सुधारतील. आर्थिक नियोजन व्यवस्थित पार पडेल. व्यवसायात प्रगतीकारक कालखंड. मनातील सुप्त इच्छा पूर्ण होईल.

**मकर** — व्यावसायिक कामे प्रगतीपथावर राहतील. कामांचा अडथळा दूर होईल. आईच्या पाय व पाठीच्या दुखीच्या समस्या कमी होईल. मनावरचे दडपण कमी होईल. रुसलेल्यांना मनवण्यास चांगला कालखंड. मैत्रीचे संबंध सलोख्याचे होतील.

**कुंभ** — संततीचा स्वभाव चिंतेचा विषय करू शकतो. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांचे दडपण दूर होईल. नवीन कामे मिळवण्यात यश मिळेल. आपला अमुल्य वेळ चर्चा करण्यात वाया जाणार नाही याची काळजी घ्यावी.

**मीन** — नशीबाची साथ लाभेल. नवीन वस्तु खरेदी करण्यास शुभ कालखंड. जुन्या वस्तु विकत घेण्याचा मोह टाळावा. नोकरदारासंबंधित समस्या सोडवण्यात यश मिळेल. अनुभवी व्यक्तीच्या सल्ल्याने कामे सुरवात करावी.

# पत्रकार संरक्षण कायद्यासंदर्भात केंद्राशी बोलू : अण्णा हजारे

आधुनिक केसरी न्यूज



**पारनेर :** पत्रकार संरक्षण कायदया विषयी फार मोठा गवगवा झाला असला तरी कार्यवाही झालेली दिसत नाही म्हनुण सर्व माहीती घेऊन पत्रकार संरक्षण कायदया विषयी पाठपुरावा करू असे ठोस आश्वासन जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी दिले.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांच्यासह शिष्टमंडळाने राळेगणसिध्दी येथे अण्णांची भेट घेत पत्रकार संरक्षण कायदा आणि पत्रकारांच्या विविध समस्या बाबत चर्चा केली.

अण्णा हजारे यावेळी बोलताना म्हणाले की पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी आपण सैदव तत्पर आसुन शासनाने याबाबत काय भुमिका घेतली याचीही माहीती घेऊ. कारण लोकशाहीचा चौथास्तंभ म्हणजे पत्रकार असतो मात्र शासन कर्त्याची मानसिकता चांगली असावी लागते पत्रकारांच्या कायद्याविषयी दुर्लक्ष करून शासन काय साध्य करणार असा सवाल करत अण्णा पुढे बोलताना म्हणाले की वेळप्रसंगी पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आपण आग्रभागी राहु असे ते म्हणाले.

डॉ . विश्वास आरोटे यावेळी अण्णाशी चर्चा करताना म्हणाले की कोरोनाकाळामध्ये पत्रकारांनी जीव धोक्यात घालुन साथरोग नियंत्रण करण्यासाठी प्रबोधन केले राज्यात सुमारे २४० पत्रकारांचा कोरोनाने बळी घेतला तात्कालिन अरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी पत्रकारांना पन्नास लाख रुपयाचे विमा कवच देण्याचे जाहीर केले मात्र ती घोषणा कागदावरच राहिली त्या मयत पत्रकारांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे.पत्रकारांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी तसेच केंद्र शासनाच्या नवीन कामगार धोरणातुन पत्रकाराना वगळले आसुन या कायदयावर हरकत घेणार आसुन अण्णा हजारेकडे पाठबळ देण्याची विनंती केली. यावेळी राज्य पत्रकार संघाचे ब्रॅण्डअम्बेसेडर पत्रकार संजय फुलसुंदर ही उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे संपर्क प्रमुख संजय मोरे यांनी पत्रकार संरक्षण कायदयासंदर्भात पत्रकारांच्या समस्या व शासनाची दिरंगाई याबाबतची माहिती अण्णा हजारे यांना पुराव्यासह दिली राज्य मराठी पत्रकार संघाचे सचिव राम तांबे यांनी आभार मानले.

**डॉ .आरोटेंचा अण्णाच्या हस्ते सत्कार**

राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे याना अमेरिकन इंटरनॅशनल युनिव्हरसिटी कडुन विद्यावाचस्पती ( डॉक्टेरेट ) मिळाल्या बद्यल अण्णानी त्यांचे कौतुक करून सत्कारही केला.

# लोकविकास बँकेला सभासदांना दहा टक्के लाभांश वाटपाची परवानगी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** भारतीय रिजर्व बँकेने सन 2021-22 या वर्षांसाठी लोकविकास बँकेच्या सभासदांना 10 टक्के लाभांश वाटपाची परवानगी दिली आहे. लोकविकास नागरी सहकारी बँकेची दिनांक 17/07/2022 रोजी पार पडली आहे. सदरच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेचे अध्यक्ष मा.श्री. एकनाथ जाधव यांनी बँकेच्या सभासदांना सन 2021-22 या वर्षासाठी लाभांश वाटपाची घोषणा केली होती. लाभांश वाटपाची परवानगी मिळालेल्या मराठवाडयातील ठराविक बँकापैकी लोकविकास बँक हि एक आहे. बँक दरवर्षी भारतीय रिजर्व बँकेच्या सर्व आदर्श मापदंडाचे पालन करून आपल्या सभासदांना नियमितपणे लाभांश देणारी एकमेव बँक आहे.

31 मार्च 2022 रोजी संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये बँकेचे अध्यक्ष मा. श्री. एकनाथ जाधव व संचालक मंडळाच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली बँकेने जुने थकीत कर्जदार यांच्या वसुलीसाठी नियोजनात्मक पाठपुरावा करून थकीत कर्ज मोठया प्रमाणात वसुल केले आहे. बँकेची नफा क्षमता वाढविण्यासाठी उपलब्ध निधीचे भारतीय रिजर्व बँकेच्या निर्देशाप्रमाणे योग्य त्या ठिकाणी विनियोग करून व खर्चात काटकसर करून बँकेची नफा क्षमता वाढवून बँकेच्या सभासदांना दरवर्षी नियमित लाभांश देणे व समाजातील उपेक्षित घटकांना आर्थिक विकासाच्या प्रवाहात आणण्याचे काम आगामी काळात करण्यांचा संचालक मंडळाचा मानस आहे. बँकेच्या सभासदांना लाभांश वितरण सुरू असून ज्या सभासदांचे बँकेत खाते आहे त्यांच्या खात्यावर प्रत्यक्ष लाभांश जमा करणे सुरू आहे. तसेच ज्या सभासदांचे बँकेत खाते नाही त्यांनी खाते उघडून आपला लाभांश खात्यावर वर्ग करावा.

बँकेतर्फे मोठया प्रमाणात राबविण्यांत येत असलेल्या आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या कर्ज योजना, इतर कर्ज योजना, ठेवं योजना तसेच सर्व अत्याधुनिक सेवा व सुविधांचा लाभ घेण्यांचे आव्हान बँकेचे अध्यक्ष श्री. एकनाथ जाधव, उपाध्यक्ष श्री. रामदास फड, संचालक सर्वश्री जे. के. जाधव, विनायक गवळी, केशव तुपे, मुरलीधर जगताप, माधव जेऊघाले, पोपट जाधव, ललित माळी, सौ. अनुराधा अंबादास दानवे, किसन भादे, सुनिल ठाकरे, प्रशांत देसरडा, सौ. अलका अंबादास कुलकर्णी, दिपक अहिरे, कचरदास राउत, सुदाम घावटे, भावराव गायकवाड, व्यवस्थापन मंडळाचे रावसाहेब शेळके, सुनिल काला, डि.एस. काटे, सुनिल कसबेकर व अरविंद पानीकर यांनी केले आहे.

# प्राचीन मंदिरे म्हणजे हिंदू राज्यकर्त्यांच्या प्रगल्भ विचारांचा आदर्श : दीपा मंडलिक

आधुनिक केसरी न्यूज



परभणी : प्राचीन भारतीय मंदिरे म्हणजे हिंदू राज्यकर्त्यांच्या प्रगल्भ विचारांचा आदर्श होते असे प्रतिपादन मुंबई येथील प्राचीन भारतीय मंदिरांच्या अभ्यासक दीपा मंडलिक यांनी येथे बी. रघुनाथ महोत्सवात झालेल्या व्याख्यानात केले. रविवार दि. ११ ते १४ सप्टेंबर दरम्यान येथील गणेश वाचनालयात बी रघुनाथ महोत्सव संपन्न होत आहे. या महोत्सवात मंगळवार 13 रोजी प्राचीन भारतीय मंदिरे या विषयावर व्याख्यान देताना श्रीमती दीपा मंडलिक यांनी भारतातील विविध प्राचीन मंदिरांची प्रोजेक्टरच्या सहाय्याने महत्वपूर्ण माहिती दिली. त्यांनी केरळातील पद्मनाभ मंदिराच्या इतिहासाची माहीती देत त्या ठिकाणच्या प्रचंड सोने-नाणे संपत्तीचा मालक विष्णू देवता असल्याचे सांगितले. तसेच या मंदिराचा जीर्णोद्धार चोळवंशीय राजा मार्तंड वर्मा याने केला असून येथील मूर्ती आणि गोपुरे यांची रचना अद्वितीय असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की वेरुळ येथील प्रसिद्ध कैलास मंदिर लेणी हे राष्ट्रकूट राजा कृष्ण राज प्रथम याच्या कार्यकाळात बांधण्यात आले बेसॉल्ट खडकात कोरलेले या मंदिराचे बहुतांश काम वीस वर्षात पूर्ण झाले. ते पुढे चौदाशे टिकून आहे. अखंड खडकात शिखरापासून पायापर्यंत कोरलेले हे शिवमंदिर जगातले एकमेव अतुल्य शिल्प आहे असेही त्या म्हणाल्या. त्यानंतर दक्षिण भारतातील कांजावरमचे मंदिर राजेंद्र चोळ याने कसं उभारले, ऐरावतीचे मंदिर तारासूर हा रथ मंदिराचा कसा अपूर्व प्रकार असल्याचे सांगून येथील स्थापत्याची माहिती दिली. येथे विपुल प्रमाणात शिल्पा असून इतर चोल मंदिराच्या तुलनेत अनोख्या व विपुल प्रमाणात शिल्परचना या ठिकाणी पहावयास मिळते. प्राचीन चोळ, चेर, होयसळ, राष्ट्रकुट, यादव काळातील काही शिल्प दक्षिण भारतात विविध मंदिरात आजही तत्कालीन सांस्कृतिक प्रगतीची साक्ष देतात, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

# रस्त्याची दुरुस्ती करा : संतोष मापारी

आधुनिक केसरी न्यूज



**लोणार :** सद्या पावसाळ्याचे दिवस असल्याने महात्मा बसेश्वर चौक ते कृषी उत्पन्न बाजार समिती पर्यंत जागोजागी रोड वर पाणी साचत आहे या रस्त्याच्या दुतर्फा नाल्या नसल्याने पावसाचे पाणी रोडवरच साचून रहात आहे यामुळे रस्त्यामध्ये मोठमोठे खडे पडत आहेत त्यामुळे हा रस्ता वारंवार खराब होत आहे. हा रस्ता शहरातील वर्दळीचा रस्ता आहे याच रस्त्यावर कृषि उत्पन्न बाजार समिती असून मोठ्या प्रमाणात जड वाहतूक या रस्त्याने होत आहे तसेच या रस्त्याने मोठ्या शैक्षणिक संस्था असल्याने स्कुल बस वाहतूक सुध्दा मोठ्या प्रमाणावर होत असते त्यामुळे या रस्त्याच्या दुतर्फा नाली बांधकाम करून हा रस्ता अद्ययावत करावा. हिरडव रोड या नावाने ओळख असलेल्या या रस्त्यावर अनेक मोठी प्रतिष्ठाने व्यापारी संकुल असल्याने या रस्त्यावर नेहमीच परंतु रस्त्यावर वर्दळ असते पडलेल्या मोठ्या खड्ड्यात पडून रोजच दुचाकी व सायकल स्वार जखमी होत आहेत तसेच जडवाहतुकिचे वाहने सुद्दा या खड्यात फसल्यावर मोठी वाहतूक कोंडी निर्माण होत असते. त्यामुळे या रस्त्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी लोणार नगरपरिषद चे आरोग्य सभापती संतोष मापारी यांनी संबंधित विभागाकडे केली आहे.

# ७२ वर्षांनी होणार चित्त्याचे जंगी स्वागत

## वन परिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे यांनी केले विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे जि.प.प्राथमिक शाळेत वन परिक्षेत्र अधिकारी निलेश सोनवणे अजिंठा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

भारतातून नामशेष झालेल्या वन्य प्राणी चित्ता हा १७ सप्टेंबर २०२२ रोजी मध्येप्रदेश मधील कुरो या व्याघ्रप्रकल्पात आणण्यात येणार आहे अशी माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दिली.देशात १९५२ मध्ये राजस्थान, मध्य प्रदेशातून चित्ता नामशेष झाल्याचे शिक्कामोर्तब करण्यात आले. आता तब्बल ७२ वर्षांनंतर चित्ता १७ सप्टेबर रोजी भारतात येत आहे, त्याअनुषंगाने अजिंठा वनविभागाने या इव्हेंटची जोरदार तयार फर्दापूर,सावळदबारा परिसरात चालविली आहे.




चित्ता हा शेड्युल्ड १चा वन्यजीव असून, याविषयी शाळा, महाविद्यालयात जनजागृती केली जाणार आहे. प्रचार व प्रसारासाठी वनविभाग पुढाकार घेणार आहे.गवताळ प्रदेशात राहणारा चित्ता हा बिबट्यासारखा दिसत असला तरी तो बिबट्यापेक्षा चपळ आणि हटके असतो. १९५२ मध्ये शेवटचा चित्ता राजस्थानातून नष्ट झाल्याचे केंद्र शासनाने घोषित केले होते. त्यानंतर भारतात चित्ता आणण्यासाठी जोरदार प्रयत्न झाले. सर्वोच्च न्यायालयाने सन २०२० मध्ये आँफ्रिकन चित्ता भारतात आणण्याची परवानगी दिली. आता मध्ये प्रदेशच्या कुनो राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्प मध्ये आणून सोडणार आहे. हा प्रकल्प समृद्ध गवताळ प्रदेश असून त्या भागात हा चित्ता वास्तव करून राहिणार आहे. तेथे सोलर कुंपण करून त्या चित्तावर निगराणी ठेवली जाणार आहे.अशे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी परिमंडळ अधिकारी अविनाश राठोड, प्रा ।जीवन कोलते( सामाजिक कार्यकर्ते ),उपसरपंच मो.आरिफ मो.लुखमान,फकीराभाऊ तडवी, वनरक्षक एस.डी.चाथे,डी.ए.वाघ,जी.पी.नन्नावरे,एस. बी.खडेँ,बी.आर.राठोड,केंद्र प्रमुख एम.डी.सोनोने, भागवत गायकवाड, सतीश ढोणे,निता हिरास मँडम,गवई सर,शिक्षकवृंद,हंगामी वनमजूर व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती अजिंठा वनपरिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांनी दैनिक आधुनिक केसरीचे सोयगाव तालुका प्रतिनिधी गोकुळसिंग राजपूत यांच्याशी बोलताना दिली.

""केंद्र सरकारच्या वने व पर्यावरण विभागाच्या गाईडलाईननुसार चित्ताबाबात जि.प.शाळा महाविद्यालयात पोस्टर लावून जनजागृती करण्यात येत आहे. चित्तयाचा इतिहास, भारतातील जुने वास्तव आदी माहिती विद्यार्थ्यांना सावळदबारा परिसरात त्या अनुषंगाने अजिंठा वन परिक्षेत्राचे अधिकारी निलेश सोनवणे यांनी सांगितले.



# World War 3 ची भीती !

आधुनिक केसरी

टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी इलॉन मस्क यांनी एप्रिल महिन्यामध्ये ट्विटर खरेदी करण्याचा मानस जुलै महिन्यामध्ये खोडून काढत या संभाव्य करारातून माघार घेतली. आता या प्रकरणाची अमेरिकेतील न्यायालयामध्ये सुनावणी सुरु आहे. एप्रिल महिन्यात त्यांनी तब्बल ४४ अब्ज डॉलर एवढी प्रचंड रक्कम खर्चून ट्विटर खरेदी करत असल्याचे जाहीर केले होते. ट्विटरच्या संचालक मंडळानेसुद्धा या व्यवहाराला मंजुरी दिली होती. मात्र आता या व्यवहारासंदर्भात एक वेगळीच माहिती समोर आली आहे. हा व्यवहार तातडीने होऊ नये असं मस्क यांना वाटतं होतं. एका खासगी संवादामध्ये मस्क यांनी या व्यवहारामध्ये अधिक धोका असल्याचं मत व्यक्त करताना रशिया आणि युक्रेन युद्धाचासंदर्भ देत, 'जग तिसऱ्या महायुद्धाकडे जात असेल तर ट्वीटर खरेदी करण्यात अर्थ नाही' असे म्हटले होते. सध्या मस्क आणि ट्वीटर यांच्यादरम्यान अमेरिकेतील न्यायालयामध्ये सुरु असणाऱ्या सुनावणीदरम्यान मस्क यांनी पाठवलेल्या या खासगी टेक्स मेसेजचा संदर्भ समोर आल्याचं वृत्त बिझनेस इनसायडरने दिलं आहे. ही सुनावणी आता ऑक्टोबर महिन्यापर्यंत पुढे ढकलण्यात आली असली तर मस्क यांना हा करार करताना तिसऱ्या महायुद्धाची भिती वाटत होती हा विषय सध्या चर्चेत आहे. जुलैमध्ये या व्यवहारामधून माघार घेताना ट्विटरने कराराचे उल्लंघन केल्याचा आरोप मस्क यांनी केला. ट्विटरकडून बनावट खात्यांची माहिती देण्यात येत नसल्याचे कारण देत मस्क यांनी ट्विटर खरेदीच्या व्यवहारातून माघार घेतली होती. दरम्यान हा व्यवहार रद्द करण्यासंदर्भात न्यायालयामध्ये सुरु असणाऱ्या सुनावणीमध्ये मस्क यांनी ८ मे रोजी मॉर्गन स्टॅनली या नामांकित कंपनीच्या बँकरला पाठवलेल्या मेसेजचा खुलासा झाला आहे. मस्क आणि ट्विटरदरम्यानच्या करारामध्ये मॉर्गन स्टॅनली कंपनी आर्थिक व्यवहार पाहत आहे. या मेसेजमध्ये मस्क यांनी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्या भाषणाचा संदर्भ दिला होता. ९ मे रोजी नाझीच्या जर्मनीवर विजय मिळवल्याच्या पार्श्वभूमीवर साजरा करण्यात आलेल्या ७७ व्या विजय दिनानिमित्त पुतीन यांनी भाषण दिले होते. रशियातील नागरिकांना उद्देशून केलेल्या भाषणामध्ये रशियाने युक्रेनवर हल्ला करण्याचा निर्णय योग्य असल्याचा दावा पुतीन यांनी केला होता. याच भाषणात पुतिन यांनी पाश्चिमात्य देश रशियावर आक्रमण करणार होते असा दावाही पुतीन यांनी कोणत्याही पुरावे न देता केला होता. याच पार्श्वभूमीवर मस्क यांनी त्यांच्या आणि ट्वीटरदरम्यानच्या आर्थिक व्यवहारांवर देखरेख ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला पाठवलेल्या मेसेजमध्ये, "काही दिवस या व्यवहारासंदर्भात जरा संथ गतीने काम करुयात," असे म्हटल्याचा दावा ट्वीटरच्या वकिलांनी न्यायालयात केला. "पुतीन यांचे उद्याचे भाषण फार महत्त्वाचं आहे. आपण तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करत असू तर ट्वीटर विकत घेण्यात काही अर्थ नाही," असे मस्क यांनी पाठवलेल्या मेसेजमध्ये म्हटल्याचं ट्वीटरच्या वकीलांनी मेसेज न्यायालयात वाचून दाखवत सांगितलं.यावर मस्क यांचे वकील ॲलेक्स स्पीरो यांनी, "हा पूर्णपणे तर्कशून्य दावा आहे. संपूर्ण संवाद पाहिल्यास हे लक्षात येईल," असे म्हटले आहे.



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

# गोवा राज्यातील कॉंग्रेस पक्षाच्या चिंधड्या

आधुनिक केसरी

**नेहमी प्रमाणे गोवा कॉंग्रेसचे आमदार भाजपात सामिल झाले. मागच्या निवडणुकीत ही विजयी आमदार असेच भाजपा मध्ये विलीन झाले होते. मग यावेळी कॉंग्रेस पक्षाने उमेदवारी देताना प्रत्येक उमेदवाराकडून पक्षनिष्ठेची प्रतिज्ञापत्रे घेऊनही आज आमदार फुटले. याचे दोन प्रकाराने विश्लेषण करावे लागेल. एक. राजकीय क्षेत्रात पक्षनिष्ठा, ध्येय धोरणे आणि सेवाभाव लोप पावले असून ाजकारण हा निव्वळ धंदा, व्यवसाय झाला आहे. राज्याचा, देशाचा विकास, प्रगती, निस्पृह कर्तव्ये पार पाडणे या बाबी गौण आहेत.**

दोन. सत्तेची गणिते, पक्षांतराचा मोबदला आणि काळ्या पैशांचा वाढता खेळ, तसेच निर्लज्जपणा कारणीभूत आहेत. एकीकडे कॉंग्रेस पक्ष भारत जोडो यात्रा काढून मोदी सरकार विरोधात जनमत तयार करण्यासाठी राहूल गांधींना भारतभर फिरवत आहेत. आणि त्याच वेळी एका राज्यातील कॉंग्रेस आमदार फुटून भाजपात प्रवेश करत आहेत. हा विरोधाभास कॉंग्रेस ला अंतर्मुख करणारा आहे. पण नाही, यावर राहूल गांधी काहीच बोलणार नाहीत. ते आपले गुण उधळत फिरत राहणार. मग धान्ये, कडधान्ये लिटर मध्ये उपलब्ध करून देऊ, ईकडुन बटाटा टाका तिकडून सोने बाहेर येईल म्हणणार. विधवांच्या नवऱ्यांना तातडीने नोकऱ्या देऊ असले अकलेचे तारे तोडत फिरणार आणि तरीही भारतीय मतदारांनी कॉंग्रेस ला मते देऊन राहूल गांधी सारख्या बालबुध्दिच्या मालकाला स्विकारा असे म्हणणार.

स्वदेशी माल वापरा असे 41000/- रू. चा विदेशी टीशर्ट घालुन कंठशोष करत सांगणार. राजस्थान हे एकच त्यातल्या त्यात मोठे राज्य हातात असूनही तिकडे दुर्लक्ष करत, पक्षांतर्गत दुफळी सांभाळत बसणार.

आता अशोक गहलोत यांना पक्षाध्यक्ष करून सचिन पायलट ला मुख्यमंत्री करून सर्व आलबेल असल्याचे भासवत हेही राज्य हातचे घालवणार. केरळ मध्ये सात आठ दिवस रमलेले राहूल गांधी उत्तरप्रदेश सारख्या दहा केरळ बसतील एवढ्या मोठ्या राज्यात मात्र भारत जोडो यात्रे दरम्यान फक्त दोन दिवस देणार आहेत. कारण आत्मविश्वासाचा अभाव, हेच एकमेव कारण या मागे आहे. भारत जोडो हे नावच विसंगत आहे. भारतातील कोणतेही राज्य सध्या फुटलेले नाही. कोणत्याही राज्याने तसा ईशाराही दिलेला नाही. मग हे कोणाला जोडत आहेत आणि कोणाशी आणि कुठे.

सगळं थोतांड आहे. अत्यल्प प्रतिसाद लाभत आहे. या यात्रे मुळे राहूल गांधी यांचे पक्षाध्यक्ष बणने सोपे, सुलभ होईल असेही दिसत नाही. वायनाड हा आपला मतदार संघ केरळात आहे, मुस्लिम संख्या लक्षणीय आहे म्हणून तिथे जास्त रमले. ईतर ठिकाणी धावती भेट चालू आहे. सोनिया गांधी थकत चालल्यात,औषधोपचार करण्यासाठी सतत भारता बाहेर




जात असतात. साठ वर्षे कॉंग्रेस सत्तेत होती तरीही ट्रिटमेंट साठी परदेशातच जावे लागते याचेही कोणाला काहीही वाटत नाही. मविआ सरकारचेच अडीच वर्षाचे काळात वेदांत सेमीकंडक्टर सोबत वाटाघाटी गांभीर्याने न करता, फक्त फायद्याचा पाठपुरावा करत बसून वेळ घालवला आणि आता हव्यात त्यापेक्षा अधिक सवलती आणि सुविधा उपलब्ध करून देऊन जर गुजराथ ने तो उद्योग पळवला तर आता हेच मविआ चे जयंत पाटील, अजितदादा दिड महिन्याच्या युती सरकारवर खापर फोडू पाहात आहे. एवढा निर्लज्जपणा आणि निर्ढावलेपणा येतोच कोठून यांच्यात.

नऊ दहा महीने वाटाघाटी चालु असूनही जर तो उद्योग महाराष्ट्रात येत नाही आणि केवळ दिड ते दोन दिवसात त्याच सोयी सवलतीच्या वाटाघाटी गुजराथ करत असेल तर दोष कोणाचा आहे. चांगले लाख दिड लाख नोकऱ्या उपलब्ध होणार होत्या. पण स्वार्थी वाटाघाटीत वेळ घालवून उद्योग घालवला आणि आता शिंदे फडणवीस यांचे नावावर पावत्या फाडत आहेत. हे लोक फक्त स्वार्थाच्या वाटाघाटी करत होते, पुण्याजवळ तळेगाव मध्ये येऊ घातलेला हा प्रकल्प मविआ सरकारचे करंटेपणाने गुजराथ ला जात आहे फक्त. राजस्थान ही हे लोक घालवणार आणि मग मोदी शाह यांचे नावाने शिमगा करत बसणार.

आदित्य ठाकरे सारखं शेंबडं पोर जेंव्हा हा ही प्रकल्प महाराष्ट्राबाहेर गेला म्हणाले. हे घडलं तेंव्हा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गणेश दर्शन घेत फिरत होते. चाळीस गद्दार सोबत घेऊन, असेही ते म्हणाले. ते शेंबडंच पोर त्याला काय कळते, कोणताही नवीन होऊ घातलेला प्रस्तावित प्रकल्प असा एक दिवसात राज्या बाहेर नाही जाऊ शकत. मागील चार सहा महिने मविआ सरकार बरोबर चर्चा चालू असणार, व्यवहार जमला नाही, मागणी पूर्ण करायची तयारी या नवीन प्रकल्प माणसांची नसल्याने मविआ सरकारने परवानगी नाकारली, जशी वेदांत सेमीकंडक्टर ला त्रास दिला तसाच प्रकार याही बाबतीत घडला असणार. आता हे दोन्ही प्रकल्प गुजराथ मध्ये गेल्याची बोंब मविआ वाले मारत आहेत. सगळं खोटं आहे हे. मविआ च्या मागण्या या दोन्ही प्रकल्प प्रमुखाने नाकारल्या मुळे ते बाहेर गेलेत.



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

# चीनमुळे आता जपानही झाला युद्धसज्ज

आधुनिक केसरी

**आज संपुर्ण जगच अस्थिर आहे. युरोप असो की आशिया, आफ्रिका असो की अमेरिका अशा सर्वच खंडातील देशांमध्ये सध्या वर्चस्वाची लढाई सुरू आहे. कोण कोणत्या देशावर केंव्हा हल्ला करेल याची शाश्वती नाही. त्यातच चीन, अमेरिका आणि रशिया यासारख्या युद्धखोर देशांना तर लहान देशांच्या कुरापती काढून जगाला अस्थिर ठेवण्याचा छंदच जडला आहे. रशियाने युक्रेनवर हल्ला करून युरोप अस्थिर केला तर इकडे आशियात चीन स्वतःच्या विस्तारवादी महत्वाकांक्षेने आशियाला अस्थिर करत आहे. भारताच्या सतत खोड्या काढून भारतावर दबाव निर्माण करतानाच साम, दाम, दंड, भेद नीतीचा अवलंब करून आशियातील छोट्या देशांना चीनने सळो की पळो करून सोडले आहे.**

आता हेच पहा ना तैवान हा जगातील अतिशय छोटा देश या देशाचे स्वतंत्र अस्तित्व मानायला चीन तयार नाही त्यामुळे या दोन्ही देशात सतत तणाव असतो. त्यात मागील महिन्यात अमेरिकेन सिनेटच्या अध्यक्षा नॅन्सी पॉलिसी यांनी तैवानला भेट दिल्यामुळे चीन चांगलाच खवळला आणि त्यांनी अमेरिकेला इशारा देण्यासाठी थेट तैवानच्या सागरी हद्दीत क्षेपणास्त्रे डागली. बरे इतक्यावर शांत बसेल तो चीन कसला त्याने कारण नसताना जपानच्या विशेष सागरी क्षेत्रात (स्पेशल इकॉनॉमिक झोन ) देखील पाच क्षेपणास्त्र डागली. अमेरिका आणि तैवानला इशारा देतानाच त्यांनी जपानलाही इशारा दिला. जपानला इशारा देण्यामागचे कारण म्हणजे जपान आणि भारताची वाढलेली सलगी. जपान आणि भारताची मागील काही वर्षात झालेली घट्ट मैत्री चीनला पाहवत नाही शिवाय चीन विरोधात सक्रिय झालेल्या क्वाड गटात जपानही आहे त्यामुळे चीन आता जपानलाही आपला शत्रू मानू लागला आहे त्यामुळेच जपानच्या सागरी क्षेत्रात क्षेपणास्त्रे पाठवून चीनने जपानला इशारा देण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात चीनची ही कृती जपाननेही गांभीर्याने घेतली असून भविष्यात चीन आपल्याला भारी पडेल हे ओळखून जपानने २० हजार टन क्षेपणास्त्रे डागू शकतील अशा दोन युद्धनौका तयार करण्याचा निर्णय घेतला. जपानने घेतलेला हा निर्णय सध्या जगतिक पातळीवर चर्चेचा विषय ठरत आहे. कारण युद्ध आणि अणुबॉम्ब यापासून चार हात दूर राहायचे असे जपानने ७७ वर्षापासूनचे धोरण आहे. आपल्याला माहीतच आहे की युद्धाची सर्वाधिक झळ कोणाला बसली असेल तर ती जपानला. १९४५ साली दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अणुबाँब टाकून ही शहरे बेचिराख केली होती. या भीषण हल्ल्याने जपानच्या नागरिकांचे प्रचंड खच्चीरकरण झाले होते. हे खच्चीकरण इतके प्रचंड झाले होते की जपानचे नागरिक युद्ध नको म्हणून त्यांच्याच सरकारच्या विरोधात रस्त्यांवर उतरले होते. त्यामुळे जपानच्या तत्कालीन सरकारने अमेरिकेशीच सामंजस्य करार करून देशाचे रक्षण करण्याची विनंती केली होती. तेंव्हापासून अमेरिकन सैन्य जपानच्या सुरक्षा व्यवस्थेत आहे. युद्धाची झळ बसलेल्या जपानने १९६१ साली अणुबॉम्ब बनवणार नाही आणि दुसऱ्या देशांचा अणुबॉम्ब जपानच्या भूमीवर ठेवू देणार नाही अशी शपथ घेतली. २०२० पर्यंत जपानने ही शपथ कसोशीने पाळली. मात्र २०२० सालापासून अमेरिका, चीन आणि रशिया या युद्धखोर देशांकडून घेतले जात असलेल्या निर्णयामुळे जग पुन्हा तिसऱ्या महायुद्धकडे वाटचाल करत असल्याने आपल्या देशाच्या सुरक्षेसाठी जपानने घेतलेल्या शपथेला बाजूला सारून युद्ध अभ्यास घेतला. त्याआधी कधीही जपानने युद्ध अभ्यास केलेला नव्हता. युद्ध अभ्यासानंतरही जपानने आपल्या शस्त्र सज्जतेकडे तसे दुर्लक्षच केले होते मात्र ४ ऑगस्ट २०२२ हा दिवस त्यांच्यासाठी पुन्हा टर्निंग पॉईंट ठरला. चीनने डागलेल्या नऊ क्षेपणास्त्रांपैकी पाच क्षेपणास्त्रे जपानच्या विशेष सागरी क्षेत्रात कोसळले. चीनने दाखवलेल्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन जपानने गांभीर्याने घेतले आणि ७७ वर्षांपासून सुरू असलेले आपले धोरण बदलून युद्धसज्ज होण्याचा निर्णय



घेतला. जपानने आपला लष्करी खर्चही वाढवून तो ५० अब्ज डॉलरवर नेला आहे. इतकेच नाही तर २०२३ च्या अर्थसंकल्पात तो आणखी वाढवण्याची घोषणा केली आहे. १९४५ नंतर पहिल्यांदाच जपानने आपल्या अर्थव्यवस्थेत लष्करासाठी इतकी मोठी तरतूद केली. जपान सारख्या एका शांतताप्रिय देशाला पुन्हा युद्धसज्ज होण्याची वेळ चीनने आणि आणली आहे. चिनमुळे जपानला आपले ७७ वर्षांपासून चालू असलेले धोरण बदलावे लागले आहे. उद्या जर देशाचे सार्वभौम अस्तित्व टिकवण्यासाठी जपानने अणुबॉम्ब निर्मितीची घोषणा केली तरी आश्चर्य वाटायला नको.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



## मुलांचा कलाविष्कार
रेणुका राजेंद्र सिमंत, वय- 10 वर्षे

## पक्षी-प्राण्यांचे अधिवेशन

एकदा काय झाले
जंगलात पक्षी-प्राणी एकत्र आले

हक्कासाठी लढायचे त्यांनी ठरविले
झूमवर मिटींग घ्या वाघोबा म्हणाले

हत्ती, घोडे, माकड, मोर सर्व तयार झाले
पक्षांचे थवे निरोप घेवून गेले

सर्वदूर चर्चेला उधाण आले
झूमवर सर्व पक्षी-प्राणी एकत्र आले

पर्यावरण दिनी अधिवेशन घेऊया म्हणाले
वाघोबाला अध्यक्ष करायचे ठरवीले

मागण्यांची यादी तयार केली
सर्वांना हक्काचे घर,

प्रत्येक प्राण्याचा मोफत आयुर्विमा
सर्व गावात विश्रामगृहाची सोय

पिंजरा बंदी, सर्कशीत प्राण्यांवर बंदी
वृक्षतोड, पशुपालन राष्ट्रदोह ठरवावा

मानव व प्राणी समान हक्क करावा
गाढव, डुक्कर शिव्यांवर दंड आकारावा

सर्व पशू-पक्षी, प्राण्यांना सन्मान द्यावा
अशा मागण्यांनी अधिवेशन गाजले

पहिल्यांदाच पशू-पक्षी प्राणी वरचढ झाले
कोरोनाने त्यांचे मोठे काम केले

पशू-पक्षी, प्राणी गावात फिरू लागले
प्राणी संवर्धन वर्ष जाहीर झाले

पशू-पक्षी, प्राण्यांचे स्वप्न पुर्ण झाले
परत झाडांवर राघू-मैना गाऊ लागले

**@संजय काव्या - 7743918559**





## भगवंताचे अस्तित्व

थॉमस अल्व्हा एडिसन एकदा रेल्वेने प्रवास करीत होते, त्यांच्यासमोर एक मोठे प्रोफेसर बसले होते. एडिसन बायबल वाचत होते, ते प्रोफेसर नास्तिक होते त्यामुळे ते एडिसन यांना म्हणाले, "अहो तुम्ही चांगल्या घरातील दिसता, वय पण 45 एक आहे मग देव देव करण्यापेक्षा काहीतरी चांगलं कार्य करा आणि समाजात नाव कमवा, हे बायबल वाचून काय होणार? फेकून द्या बघू ते रेल्वे च्या बाहेर." हे ऐकून एडिसननी गपचूप बायबल आपल्या पिशवीत घातले. त्या प्रोफेसरनी आपलं कार्ड एडिसनना दिले व सांगितले की, काही काम हवं असेल तर मला कॉन्टॅक्ट करा. एडिसनचे स्टेशन आल्यावर ते उतरू लागले असता एडिसननी सुद्धा आपले कार्ड त्यांना दिले व ते उतरले. त्यानंतर ते प्रोफेसर सुद्धा आपल्या घरी पोचले.
आठवड्याचे कपडे धुवायला काढताना त्या प्रोफेसरना ते कार्ड सापडले, त्यादिवशी त्यांनी ते गडबडीत आपल्या खिश्यात टाकले होते, आज ते कार्ड बघून ते अचंबित झाले. आपण एका महान शास्त्रज्ञासमोर होतो आणि आपल्याला कळलंच नाही आणि आपण काय बोललो याबद्दल त्यांना अपराधी वाटू लागले. या जगविख्यात शास्त्रज्ञाने विजेचा बल्ब, फिल्म, फोनोग्राफ, ग्रॅहॅमचा, फोनमधील सुधारणा वगैरे अनेक शोध लावून जगावर उपकाराचे डोंगर उभारले.
त्यांनी लगेचच त्यांना भेटण्यासाठी अपॉइंटमेंट घेतली. त्यांच्या प्रयोगशाळेतच ते दोघे भेटले. ती प्रयोगशाळा पाहून प्रोफेसर थक्क झाले. ते म्हणाले "वा, काय प्रयोगशाळा आहे तुमची, खरंच तुम्ही फार मोठे आहात, किती दिवस लागले हो हे सगळं करायला?" त्यावर एडिसन म्हणाले "छे हो, हे मी काहीच केलेलं नाही, सगळे आधीच तयार होते मी फक्त इथे येऊन प्रयोग केले."
त्यावर प्रोफेसर म्हणाले "माझी चेष्टा करताय काय, असं आपोआप काही तयार होत होय?" त्यावर एडिसन हसले व म्हणाले "अहो ही एवढीशी माझी प्रयोगशाळा आपोआप आली अस म्हटलेलं तुम्हाला पटलं नाही ना, मग हे "ब्रह्मांड" आपोआपच निर्माण झालं हे मला कस पटेल. प्रख्यात शास्त्रज्ञ एडिसन यानी एक सिद्धांत मांडला आहे, ते म्हणतात "Where there is a creation there should be a creator, Without a creator there is no creation so god exists."
जिथे निर्मिती असते तिच्या मागे निर्माता असतोच.
निर्मात्याशिवाय निर्मिती असूच शकत नाही.
म्हणजेच "देव" अस्तित्वात आहे.

**गोविंद देशपांडे, ठाणे**

## धोती

तुम्हाला माहितीये 2 हजार वर्षापूर्वीच एका वस्त्राने स्त्री आणि पुरुषातील फरकला मिटवून दोघांना एकसारख्या पद्धतीने सुशोभित केले. पुरातन काळात याला अंतरीया म्हणायचे आणि आता.
या धोतीला पंचे, वेष्टि, धुती, मर्दानी, छादरा आणि धोतर या नावाने ओळखले जाते. धोती ही ट्राउसर्ससारखी असते पण ट्राउसर्स पेक्षा खुप जास्त कम्फर्टेबल आणि हवेशीर असते. धोती एक 5 मीटर लांबीचा चोकोनी कापड असते तिला कमरेला लपेटून मागे किंवा पुढे बांधले जाते, आणि मग निऱ्या बनवून पयांच्या मधून खोचल जाते. धोती हे नाव धौता या शब्दापासून आलाय त्याचा संस्कृतमध्ये अर्थ होतो पंचा किंवा धुवती. कदाचित हे नाव त्याच्या 5 मीटर लांब कापड्यावरन पडलंय.



मौर्य आणि ग्रीक काळात या धोतीला कमरेवर कमरपट्टा बांधून बांधले जायच आणि याला मेखला व रसना म्हंटले जायचे. स्त्री आणि पुरुष दोघेही याचा वापर करायचे.
धोती भरतील बऱ्याच राज्यामध्ये घातली जाते. महाराष्ट्र, गुजरात, बंगालमध्ये या धोतीच चलन जास्त आहे. आजकाल धोतीला जास्तकरून धार्मिक समारोह आणि लग्नातच घातले जाते. पण पंडित आणि पुजाऱ्यांसाठी धोती आजही त्यांची रोजची वेशभूषा आहे.

**स्नेहा साळवे**






## सलाम बार्शीम

टोकियो ऑलिम्पिकमधील पुरुषांच्या उंच उडीचा हा अंतिम सामना होता. अंतिम फेरीत इटलीच्या जियानमार्को टॅंपबेरी चा सामना कतारच्या मुताजएस्सा बार्शीमशी होता. दोघांनी 2.37 मीटर उडी मारली आणि बरोबरीवर होते! त्यामुळे ऑलिम्पिक अधिकाऱ्यांनी नियमानुसार प्रत्येकाला आणखी तीन प्रयत्न करायला सांगितले, परंतु त्यात ते दोघेही 2.37 मीटरपेक्षा जास्त गाठू शकले नाहीत.
त्या दोघांना आणखी एक अतिरिक्त संधी देण्यात आली, पण पायाच्या गंभीर दुखापतीमुळे टॅंपबेरीने शेवटच्या प्रयत्नातून माघार घेतली. आता खरं तर बार्शीम समोर दुसरा विरोधक नव्हता, तो क्षण जेव्हा तो एकटा सुवर्ण पदकाचा मानकरी उरला होता!
पण बार्शीम ने अधिकाऱ्याला विचारले "जर मी सुद्धा शेवटच्या प्रयत्नातून माघार घेतली तर काय होऊ शकते का?" अधिकारी सर्व नियम तपासतो आणि म्हणतो "मग अश्यावेळी सुवर्णपदक तुमच्या दोघांमध्ये वाटले जाईल". त्यानंतर बार्शीम ने क्षणाचाही विलंब न करता शेवटच्या प्रयत्नातून माघार घेण्याची घोषणा केली.
हे पाहून इटालियन प्रतिस्पर्धी टॅंपबेरी धावला आणि बार्शीम ला मिठी मारली आणि त्याला अतीहर्षामुळे रडू कोसळले!
...खेळाच्या अत्युच्च प्रकारात एका माणुसकीची, विश्वबंधुत्वाची ही झलक हृदयस्पर्शी आहे. खेळभावना आणि प्रेम याचा हा अद्‌भुत संगम हेच ऑलिम्पिक च्या जागतिक आयोजनाचे उद्दिष्ट परिपूर्ण साध्य झाले असे म्हणता येईल. तुला मनापासून सलाम बार्शीम. तू मनं जिंकलीस लेका! ... म्हणजेच जग जिंकलास.





# मातंग एकता आंदोलनाचा सिल्लोडला जल्लोष



आधुनिक केसरी न्यूज

**सिल्लोड :** आपल्या जागतिक साहित्याच्या आणि लेखणीच्या बळांवर छत्रपती शिवरायांचा इतिहास रशियापर्यंत पोहोचविणारे साहित्याचे महामेरु साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा गौरव म्हणून रशियाच्या प्रजासत्ताक दिनी ता.14 सप्टेंबर रोजी रशियाच्या मॉस्को शहरातील शासकीय वाचनालयात साहित्यरत्न अण्णाभाऊंच्या पुतळ्याचे व तैलचित्राचे अनावरण झाले. या अविस्मरणीय क्षणाचा आनंदोत्सव व जल्लोष "मातंग एकता आंदोलन" या राज्यव्यापी संघटनेच्या वतीने सिल्लोड शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम अण्णाभाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तर ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करीत व महापुरुषांच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

याप्रसंगी "मातंग एकता आंदोलनाचे" जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, ज्येष्ठ नेते तथा जिल्हा कार्याध्यक्ष अशोक दादा कांबळे, पत्रकार, साहित्यिक तथा दलित चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते दशरथ सुरडकर, रोजगार हमी योजना संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विनोद चव्हाण, जिल्हा प्रवक्ता गजानन मानकर, जिल्हा संघटक भरत मानकर, सामाजिक कार्यकर्ते त्र्यंबक शेजुळ, संभाजीनगर पूर्व तालुकाध्यक्ष राहुल अंभोरे, सिल्लोड तालुकाध्यक्ष समाधान लोखंडे, सिल्लोड तालुका सरचिटणीस शिवदास दणके, युवक आघाडी तालुकाध्यक्ष विशाल आहिरे, सामाजिक कार्यकर्ते संजय कांबळे, ज्ञानेश्वर आहिरे, विष्णू साळवे, राजु कांबळे, अंधारी सर्कल प्रमुख दिपक सोनवणे, अंधारी सर्कल सचिव भगवान सोनवणे, कृष्णा सोनवणे आदींसहित असंख्य पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधवांची उपस्थिती होती. यांवेळी जिल्हाध्यक्ष संदीप मानकर, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कांबळे, सामाजिक कार्यकर्ते दशरथ सुरडकर, सामाजिक कार्यकर्ते त्र्यंबक शेजुळ यांनी अण्णाभाऊंच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकीत रशियात होत असलेल्या या सुवर्णक्षणाबद्दल आनंद व्यक्त केला.

# अप्पर पोलीस अधीक्षकांचे अंबाजोगाई, परळीत धाडसत्र

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांनी अंबाजोगाई येथील विविध कॉफी शॉप वरती स्वतःहून जाऊन भारतात कॉफी शॉपची थेट पाहणी केली त्यामध्ये त्यांना मुले-मुली यांना वैयक्तिकरित्या स्वतंत्र बसण्यासाठीचे कंपार्टमेंट आढळून आले. शिवाय ईतर काही बाबींवरुन त्यांना मिळालेल्या माहितीचा संशय अजून दाट बळावल्याने त्यांनी आता आंबेजोगाई



शहरांमध्ये जेवढे कॉफी शॉप आहेत त्या सर्वांना प्राथमिक स्वरूपात बैठक घेऊन ताकीद देण्यासाठी येणाऱ्या दोन दिवसात बोलावले असल्याची माहिती सुत्रांकडून कळाली असून यामुळे अंबाजोगाई शहरातील कॉफी शॉप मालकांचे चांगलेच धाबे दणाणल्याचे दिसून येत आहे. तर दुसरीकडे परळी येथे एका प्रतिष्ठित व्यक्तीने विद्यानगर सारख्या अत्यंत प्रतिष्ठित असणाऱ्या कॉलनीमध्ये लाखो रुपयांचा गुटखा दिवसाढवळ्या पकडून परळीही चांगलीच हादरून गेली असल्याचे या धाडसत्रावरून दिसून येत आहे. एकामागोमाग दोन शहरांमध्ये पोलीस प्रशासनाने हे धाडसत्र केल्याने पोलिसांचे जरीकरता कौतुक होत असले तरी विशेष कौतुक अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांचे होत आहे. कारण या दोन्ही ठिकाणच्या धाडी मध्ये वैयक्तिक अप्पर पोलीस अधीक्षक स्वतःहून हजर राहिल्याने सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

अंबाजोगाई शहरातील कॉफी शॉपची थेट पाहणी केल्याने माता-पालकांचा जीव भांड्यात अंबाजोगाई शहरातील काही ठराविक कॉफी शॉप मध्ये अल्पवयीन मुले-मुली खास बनवलेल्या अपार्टमेंटमध्ये कॉफी पिण्याच्या नावाखाली तासनतास बसून अश्लील चाळे करत असल्याची माहिती कर्तव्यदक्ष अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर यांना कळताच काही घंट्यातच त्यांनी आपले पथक घेऊन स्वतः धाड टाकून संशयित कॉफी शॉपची पाहणी केली असता त्यांना मिळालेल्या माहितीनुसार बरच काही संशयास्पद आढळून आल्याने त्यांनी तात्काळ शहरातील सर्वच कॉफी शॉप मालकांची बैठक घेऊन त्यांना प्राथमिक स्वरूपात ताकीद देऊन समज देणार असल्याचे त्यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. यानंतर मात्र कडक कारवाई करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

आई-वडिलांची फसवणूक करत असे चाळे करणा-यांना यामुळे निश्चितच आळा बसणार असला, तरी प्रत्येक माता-पालक आपल्या लेकरांसोबत शाळा-कॉलेजात जाऊ शकत नाहीत. त्यामुळे ऐक उच्चपदस्थ महिला पोलीस अधिका-याने उचललेल्या या अत्यावश्यक मोहीमेचे सर्व स्तरातून जरी कौतुक होत असले तरी विशेष करून माता-पालकांमधुन मात्र अ.पो.अ.कविता नेरकर-पवार यांचे मात्र तोंडभरून कौतुक होत आहे. एकंदरीत लेक-बाळीच्या भविष्यासंबंधीत हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असल्याने आमचा जीव ब-यापैकी भांड्यात पडला असल्याच्या प्रतिक्रिया काही माता-पालकांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केल्या. कविता नेरकर यांच्या या धाडसत्राचे शहर-परिसरासह पोलिस अधीक्षक नरेंद्रकुमार ठाकुर, सर्व पक्षीय लहान-मोठ्या स्तरातील लोकप्रतिनिधी यांच्यासह खा.डॉ.प्रितम मुंडे आणि आ.नमिता मुंदडा यांनीही कौतुक केले.

# आईच्या वाढदिवसाला आलेल्या भावी डॉक्टरवर काळाची झडप



आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** तालुक्यातील भोजला येथील सुमित भारत खंदारे (२३) ह्या नाशिक येथे बी ए, एम,एसच्या दुस-या वर्षाला शिकत असलेल्या भावी डॉक्टर वर काल रात्री काळाने झडप घातली. नियती कोणावर कसा सूड उगवेल काही सांगता येत नाही . उराशी रुग्णसेवा करण्याच स्वप्न बघणारा सुमित २ सप्टेंबर रोजी आईचा वाढदिवस साजरा करण्याचे हेतूने भोजला येथे काही दिवस साठी आला होता. एक दोन दिवसात पुन्हा नाशिकला जाण्याची तयारी करीत असतांना अचानक काल दुपारी त्याचे पोटात दुखू लागले. त्यामुळे येथील खाजगी रुग्णालयात त्याला दाखल केले. सर्व चाचण्या केल्या नंतर पेशी कमी झाल्याचे निदान होऊन सुमितला पुढील उपचारसाठी तात्काळ नागपूर ला नेण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. मात्र नागपूरला पोहोचण्यापूर्वी रात्री ९ वाजता सुमित ने अखेरचा श्वास घेतला. अभ्यासात अत्यंत हुशार होती. असलेल्या सुमितच्या उज्वल भविष्याचे परिवार स्वप्न पाहात होता. मात्र अवघ्या १२ तासात त्या स्वप्नांची राख रांगोळी झाली. सुमितच्या निधनाने येथे हळहळ व्यक्त होतं आहे. त्याचे मागे आई वडील, एक भाऊ, बहीण व बराच मोठा आप्त परिवार असून भोजला येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# शिवसेनेची गांधीगिरी, श्रमदानातून शिवसैनिकांनी गोळा केला कचरा

आधुनिक केसरी न्यूज

धुळे :-शिवसेना आणी हिरे वैद्यकीय सर्वोपचार रूग्णालय यांच नात म्हणजे विळ्याभोपळ्याच ,गेली अनेक वर्ष शिवसेना हे रूग्णालय शहरात असतांना व बाहेर असतांना इथल्या सुविधांविषयी आंदोलन करत आली, सन 2011 साली शिवसेनेने केलेले आंदोलन राज्यभर गाजले इतके की तात्कालिक वैद्यकीय शिक्षण मंत्री आणी वैद्यकीय संचालक यांना इथल्या प्रश्नावरून बैठकीतुन काढता पाय घ्यावा लागला, शिवसेनेने आंदोलन जितकी केली तितकेच इथल्या रक्त पेढीला आजपर्यंत हजारो रक्ताच्या बाटल्या रक्तदान शिबीरातुन पुरविल्या, रूग्णालयाच्या चांगल्या कामाचे वेळोप्रसंगी कौतुक ही केले, आणी या रूग्णालयाला निधीही मिळवुन दिला. आज गेल्या अनेक महिन्यांपासून हे रूग्णालय इथल्या अस्वच्छतेबाबत परत एकदा चर्चेत आले, 500 खाटांचे रुग्णालय, 200 एकरात विस्तीर्ण पसरलेल्या इमारती, स्वच्छता कर्मचारी यांचा अभाव, प्रत्येक मजल्यावर चोकअप झालेले स्वच्छता गृह, चोकअप ड्रेनेज पाईलाईन, डस्टबीनचा अभाव, वॉशबेसिनची कमतरता यामुळे रूग्णांचे नातेवाईक सरळ कचरा पोर्च मधे टाकुन मोकळे होतात, हा कचरा गेल्या अनेक वर्षांपासून उचललाच न गेल्यामुळे या रूग्णालयाचे रूपांतर डंपीग ग्राऊंड मधे होतेय की काय ही परिस्थिती आज निर्माण झाली आहे. चक्क गांधीगिरी करत रूग्णालयाच्या बाहेरील आवारातील कचरा बुलडोझर मशिन, पाटी पावडी ,खराटा हातात घेत साफसफाई केली, दोन तास चाललेल्या या सफाई मोहिमेच्या माध्यमातून तब्बल दोन टन कचरा, प्लॅस्टिक, शिवसैनिकांनी गोळा केले, पुढील आठवड्या पासुन प्रत्येक गुरूवारी एक वॉर्ड सफाई शिवसेना करणार आहे.आज या उपक्रमात शिवसेनेचे विभागप्रमुख कैलास मराठे यांनी त्यांचे बुलडोझर स्वखर्चाने उपलब्ध करून दिले, या स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ प्रभारी डिन डॉ.अरूण मोरे यांच्या हस्ते नारळ वाढवुन करण्यात आला या प्रसंगी रूग्णालयाचे डॉ. मुकरम खान, डॉ.दिपक शेजवळ आदी उपस्थित होते, या स्वच्छता मोहीमेत जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण




जोंधळे, जिल्हासंघटक भगवान करनकाळ, जिल्हा समन्वयक कैलास पाटील, महानगर प्रमुख धीरज पाटील, डॉ.सुशील महाजन, विधानसभा संघटक ललित माळी, समन्वयक भरत मोरे, गुलाब माळी, विनोद जगताप, सुभाष मराठे उपमहानगरप्रमुख शेखर वाघ, संदिप सुर्यवंशी, बाबुराव नेरकर, प्रविण साळवे, छोटुभाऊ माळी, महादु गवळी, प्रकाश शिंदे, शत्रुघ्न तावडे, मच्छिंद्र निकम, सुनिल चौधरी, मुन्नाभाई पठाण, काळु गावडे, कैलास मराठे,आबा हरळ, मुरली जाधव, रोहितड धाकड अक्षय पाटील, एजाज हाजी,शुभम रणधीर, गुलाब कोळी, महेंद्र बागुल, शुभम मतकर पवन शिंदे, किसन गवळी, अजय चौधरी, वैभव पाटील आदीसह शिवसैनिक मोठ्या संख्येत उपस्थित होते.

# 'त्या' पोलीस अधिकाऱ्याला कायमचे निलंबित करा : मराठा क्रांती मोर्चा



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जळगाव येथील स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे (LCB ) पोलीस निरीक्षक बकाले यांनी मराठा समाजाबद्दल अतिशय खालच्या दर्जाची अश्लील भाषा वापरून समाजाचा व समाजाच्या महिलांचा अपमान करून प्रचंड अशा भावना दुखावल्याबद्दल त्यांना पोलीस खात्यातून कायमचे बडतर्फ करण्याची मागणी मराठा क्रांती मोर्चा यांनी केली. जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक " किरणकुमार बकाले यांनी मराठा समाजाविषयी आक्षेपार्ह व अश्लील भाषा वापरल्याची फोन वरील रोभापणाची ऑडिओ क्लिप सर्वत्र प्रसारीत झाली आहे . एका पोलीस अधिकाऱ्याची एखाद्या समाजाविषयीची भावना व वापरलेली अश्लील घाणेरेटी भाषा पाहता अशा जातीयवादी प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याचे तत्काळ निलंबन नव्हे तर त्यास पोलीस खात्यातून कायमचे " बडतर्फ करण्यात यावे अशी मागणी केली व त्याची सर्वकश चौकशी करावी धुळे जिल्हा मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने या निवेदनाद्वारे करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार सदर पोलीस अधिकारी किरणकुमार बकाले यांनी सदर ऑडिओ क्लिप मध्ये केलेला वाक्य प्रयोग पाहता याठिकाणी नुसती मराठा समाजाचीच नव्हे तर मराठा समाजाच्या माता बधीनीबद्दल अतिशय घाणेरडे अपशब्द वापरून त्यांचा अपमान केलेला आहे त्यांनी केलेला हा गुन्हा एकप्रकारे विनयभंगाचाच असून त्यांच्यावर विनयभंगाच्या कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा तसेच त्यांना पोलीस खात्यातून कायमचे बडतर्फ करण्यात याचे ही ह्या निवेदनात प्रमुख मागणी होती.

काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत
(रविवारी मोफत तपासणी)
नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी,
वांझपणा असल्यास भेटा..!
(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व
उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.
नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in